दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● शुक्रवार ५ जूले २०२४ ● आरएनआय–एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष १ ले ● अंक ३२४ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
वादळ वार्ता
या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
दैनिक वादळ वार्ता
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता *
समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक ,सोशल मीडियाचा वापर करता येणे
दैनिक वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव विभागीय निर्भीड दैनिक
मो.न.9422660077

# विश्वविजेत्यांचं जंगी स्वागत !!एकीकडे अरबी समुद्र,तर दुसरीकडे फॅन्सचा महासागर

## मरीन ड्राईव्ह येथे उसळला जनसागर








**वादळवार्ता/मुंबई**

भारतीय क्रिकेट संघाने तब्बल १७ वर्षानंतर इतिहास रचला. टीम इंडियाने दक्षिण आफ्रिकेवर ७ धावांनी विजय मिळवत टी २० विश्वचषक स्पर्धा जिंकली. या विजयाचा जल्लोष साजरा करण्यासाठी भारतीय संघ आज मायदेशी परतली. सुरुवातीला भारतीय संघ दिल्लीच्या विमानतळावर उतरला. तेथून सकाळी भारतीय संघाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. पंतप्रधानांनी त्यांच्याशी जवळपास दीड तास गप्पा मारल्यानंतर आता भारतीय संघ मुंबईत दाखल झाला. मरीन ड्राईव्ह परिसरात मोठी गर्दी झाल्याने पोलिसांसह टीम इंडियाला घेऊन जाणाऱ्या वाहनाला वाटेत व्यत्यय येत होता. आपल्या विश्वविजेत्या संघाची एक झलक पाहण्यासाठी मुंबईकर मोठ्या संख्येने एकवटले. टीम इंडियाने वेस्ट इंडिजच्या धरतीवर ऐतिहासिक कामगिरी केली. बार्बाडोस येथे दक्षिण आफ्रिकेचा पराभव करून भारतीय संघाने विश्वचषक उंचावला. ट्वेंटी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर भारतीय क्रिकेट संघ मायदेशात परत आला. कर्णधार रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली चॅम्पियन गुरुवारी सकाळी नवी दिल्लीत पोहोचले. भारत १३ वर्षांनंतर विश्वविजेता बनला आहे. टीम इंडियाची मुंबईत विजयी परेड होत आहे. याआधी भारतीय संघाने दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. आयपीएल २०२४ मध्ये चाहत्यांच्या रोषाचा सामना करावा लागलेल्या हार्दिक पांड्यावर कौतुकाचा वर्षाव होत होता. वानखेडे स्टेडियमवर चाहते ‘हार्दिक हार्दिक’ अशा घोषणा देताना दिसले. याशिवाय लोकल बॉय असलेल्या रोहित शर्माच्या घोषणांनी स्टेडियम दणाणून निघाले. मरीन ड्राईव्ह परिसरातील तोबा गर्दी पाहता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर यांच्याशी संवाद साधला. ते म्हणाले की, आयसीसी ट्वेंटी-२० विश्वचषक विजेता भारतीय क्रिकेट संघाच्या स्वागतासाठी जमलेल्या क्रिकेट प्रेमींच्या गर्दीचे संनियत्रण करण्याचे मुंबई पोलीस आयुक्तांना निर्देश दिले आहेत. विजयवीर संघाच्या स्वागतासाठी वानखेडे स्टेडियम तसेच नरीमन पॉईंट ते स्टेडियम दरम्यान, मरिन ड्राईव्ह या परिसरात मोठी गर्दी झाली आहे. या गर्दीमुळे वाहतुक विस्कळीत होऊ नये तसेच जमलेल्या क्रिकेट प्रेमींचीही गैरसोय होऊ नये याकडे मुंबई पोलीस दल आणि संबंधित यंत्रणांनी लक्ष पुरवावे, अनुषांगिक उपाययोजना कराव्यात, अशा सूचना पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर यांना दुरध्वनीद्वारे दिल्या दरम्यान भारताच्या चॅम्पियन संघाला पाहण्यासाठी मरीन ड्राईव्ह परिसरात चाहत्यांनी एकच गर्दी केली. पावसाच्या हलक्या सरी चाहत्यांचा उत्साह वाढवत होत्या. मुंबई क्रिकेट असोसिएशनने आजच्या खास कार्यक्रमासाठी सर्व चाहत्यांना वानखेडे स्टेडियममध्ये मोफत एन्ट्री देण्याचा निर्णय घेतला. पावसाच्या सरी बरसत असल्या तरी चॅम्पियन संघाची झलक पाहण्यासाठी चाहत्यांनी क्रिकेटच्या पंढरीत मोठ्या संख्येने हजेरी लावली.

### स्वागत समारंभानंतर टीम इंडियाला 125 कोटी रुपयांचा चेक

विजयी मिरवणुकीनंतर वानखेडे स्टेडियममध्ये टीम इंडियाच्या रोहित शर्मा, विराट कोहली, राहुल द्रविड आणि जसप्रीत बुमराह यांनी आपलं मनोगत व्यक्त केलं. त्यानंतर बीसीसीआयच्या पदाधिकाऱ्यांनी टीम इंडियाला बक्षिस म्हणून जाहीर केलेल्या १२५ कोटी रुपयांचा चेक दिला.

### रोहित-विराटकडून सुरुवात, मग टीम इंडियाही थिरकली

टीम इंडिया विजयी मिरवणुकीनंतर वानखेडे स्टेडियममध्ये दाखल झाली. त्यानंतर विराट कोहली आणि रोहित शर्मा या दोघांनी नाचायला सुरुवात केली. त्यानंतर टीम इंडियाच्या साऱ्या खेळाडूंनी थिरकायला सुरुवात केली.

**टीम इंडियाच्या खेळाडूंचा मुंबईकरांसह डान्स**

टीम इंडियाच्या खेळाडूंनी ढोल ताशांवर ठेरा धरला आहे. वानखेडे स्टेडियमच्या प्रांगणात पोहचताच कॅप्टन रोहित शर्माने ढोल ताशांवर ठेका धरत क्रिकेट चाहत्यांसह डान्स केला.

मुंबई विमानतळापासूनच भारतीय खेळाडूंच्या स्वागताला जनसागर उसळल्याचं दिसून आलं. मरीन ड्राईव्ह परिसरात सागराशेजारी जनसागर पाहायला मिळाला. जय हिंद, भारत माता की जय, मुंबईचा राजा-रोहित शर्मा अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

## अफवावर विश्वास न ठेवता, बँकेत नविन खाते उघडू नये. लाडक्या बहिणींना जिल्हा अधिकाऱ्यांचे आवाहन

**नाशिक/सुरेश इंगळे**

नाशिक राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी राज्य सरकारचा अर्थसंकल्प सादर केला . त्यामध्ये राज्यात “मुख्यमंत्री लाडकी बहीण” योजना सुरू करण्यात येत असल्याची माहिती दिली .या योजनेच्या घोषणेनंतर महिलांनी बँक आणि सेतू तहसील कार्यालयात गर्दी केली आहे. ही योजना आपल्या पदरात पाडून घेण्यासाठी कागदपत्राची जुळवाजुळूक सुरू केली आहे. मात्र या योजनेसाठी लागणाऱ्या



कागदपत्रावरून अनेक संभ्रम निर्माण झाले आहेत. तसेच ऑनलाईन संकेतस्थळावर योजनेची माहिती भरण्यासाठी पर्याय येत नसल्याने लाभार्थी महिलांना मोठी कसरत करावी लागत आहे. त्यामुळे कार्यालयीन स्तरावर या योजनेच्या कागदपत्रावरून गोंधळ उडत असून विविध अफवाही पसरवल्या जात आहेत. योजनेचा लाभ घेण्यासाठी बँकेत नवीन खाते उघडण्याची अफवा देखील पसरली आहे .त्याच पार्श्वभूमीवर आता नाशिक जिल्हाधिकारी जलद शर्मा यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी नवीन बँक खाते उघडण्याची गरज नसून बँकेत कुठलेही डिपॉझिट भरू नये असे आव्हान



### भात रोप लागणीस वेग गेल्या चार दिवसांपासून

पावसाने दमदार हजेरी लावल्यामुळे भात रोप लागणीस राधानगरी तालुक्यात सर्वत्र वेग आलाआहे. कुडूत्री ता.राधानगरी येथील ही प्रातिनिधिक छायाचित्रे (१)महिला रोप लागणीत व्यस्त आहेत तर दुपारच्या भोजनाचा आस्वाद घेताना शेतकरी वर्ग

## भाजपच्या नेत्याच्या दारात डी.सी.सी बँकच्या वसुली पथकाने वाजविले डफडे !

### आंबा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन रमेश आडसकर आणि माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष विक्रम मुंडे यांच्या दारात गांधीगिरी अंदोलन

**केज/प्रतिनिधी**

बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वसुली पथकाने केज येथे आंबा साखर कारखान्याचे चेअरमन रमेशराव आडसकर आणि माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष विक्रमराव मुंडे यांच्यासह बँकेच्या थकबाकीदारांच्या दारात जाऊन डफडे वाजून गांधीगिरी पद्धतीने आंदोलन केले. याची खुमासदार चर्चा जिल्ह्यात होत आहे. या बाबतची माहिती अशी की, बुधवार दि. ३ जुलै रोजी बीड जिल्हा सहकारी बँकेचे प्रशासक तथा जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या आदेशाने आंबा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन आणि भाजपचे नेते रमेश आडसकर यांच्या साखर कारखान्याकडे एकरकमी परतफेड योजनेचे १८ ते २० कोटी रुपये थकले आहेत तसेच माजी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विक्रमराव





मुंडे यांच्या राजीव गांधी जिनींग व प्रेसिंग सहकारी संस्था म. सारूळ यांच्याकडे २८८१०१४ रुपये तर रेणुकामाता तेलबिया उत्पादक सहकारी संस्था देवगाव याच्याकडे १०९९१५४६ रुपये थकलेले असून महसूल कर्मचारी पतसंस्था यांच्याकडे लाखो रुपयांचे कर्ज थकीत असल्याने बीड जिल्हा सहकारी बँकेच्या वसुली पथकाने रमेशराव आडसकर आणि विक्रम मुंडे यांच्या केज येथील वकीलवाडी भागात असलेल्या निवासस्थानाच्या दारात डफडे वाजवत गांधीगिरी स्टाईलने अंदोलन केले आहे. या पथकात डी सी सी बँकेचे जिल्हा व्यवस्था शरद ठोंबरे, उपव्यवस्थापक डी व्ही कुलकर्णी, उपव्यवस्थापक एस बी थोरात आणि सहाय्यक व्यवस्थापक एन एम रामटेके यांच्या सह कर्मचारी हजर होते. देशात आणि राज्यात भाजपचे सरकार असतानाही भाजपच्याच नेत्यांच्या दारात डफडे वाजविल्याची चर्चा केज तालुक्यासह बीड जिल्ह्यात होत आहे.

कविता

## बाप

बाप कष्टाचाच धनी ,
राबायचा दिनरात
सुख आणाया घरात
गेली हयात शेतात । ।

दर साल सुगीलाच ,
असं घडायचं काही
कधी रुसायचा मेघ
आणि धरा वांझ होई । ।

हाती कशाचा छदाम ,
नित्य उधार उसणं
पिठा - मिठाला महाग ,
तरी जपलं हसणं । ।

मुलाबाळा पोटभर ,
देता कष्टाची भाकर
रित्या पोटानेच येई ,
त्याला तृप्तीचा ढेकर । ।

हात मातीत राबले ,
सुख कधी ना घावले
चितेवरचे जळणे ,
जितेपणीच भोगले । ।

गत उभा नित्य आधाराला ,
लळा माणसांचा त्याला
गाव भावकीत बाप ,
नाही कोणाला सलला । ।

धरा पिकता अमाप ,
दान देता बलुत्याला
बळीराजाहून मोठा ,
बाप वाटायचा मला । ।
-------------------------------
-----------

सचिन बेंडभर
पिंपळे जगताप, पो- करंदी

# पत्रकाराच्या सावधानतेमुळे हरवलेली मुलगी एका तासात सापडली!

**केज/सचिन भालेराव**

कांदेवाडी येथील आश्रम शाळेत इयत्ता तिसरीत शिकत असलेली शिवानी काळे या मुलीला शाळेत सोडण्यासाठी जात असता ती केज आपल्या आईपासुन हरवली होती. लोकनायकचे पत्रकार महादेव काळे यांनी या मुलीला समजावत तिची माहिती काढुन अवघ्या एका तासाच्या आत तिच्या आईची भेट झाली. या बाबत सविस्तर माहिती अशी की केज तालुक्यातील आरणगाव येथील पारधी समाजातील शंकर काळे यांची सात ते आठ वर्षांची मुलगी शिवानी शंकर काळे आणि तिच्यासह पाच ते सहा विद्यार्थ्यांनसह दि.४ जुलै गुरूवार दुपारी ४:०० वाजण्याच्या सुमारास केज येथुन आई लालुबाई सोबत धारुर तालुक्यातील कांदेवाडी येथे असलेल्या आश्रम शाळेत शिकण्यासाठी घेवुन जात होते. इयत्ता पहिली ते दहावी पर्यंत असणारी शासकीय आश्रमशाळा या शाळेत गेल्या दोन वर्षांपासून शिक्षण घेत आहे.या वर्षी आता शाळा सुरु झाल्याने या विद्यार्थ्यांना शाळेत सोडण्यासाठी खाजगी वाहनातून जात असताना केज येथे पंचायत समिती कार्यालयासमोर वाहन उभे करून या विद्यार्थ्यांचे नातेवाईक सामान खरेदी करण्यासाठी गेले होते. तेवढ्यात शिवानी लघुशंकेसाठी बाजुला गेली आणि ती परत येईपर्यंत सदरील वाहन शिवाजीला न पहाताच तिथेच सोडून निघुन गेले. शिवानी परत येवुन वाहन न दिसल्याने रडु लागली हि गोष्ट दै.लोकनायकचे केज तालुका प्रतिनिधी महादेव काळे यांच्या लक्षात आल्याने तिला जवळ घेत व समजावत हॉटेल मध्ये आणून पाणी देत. तिचे नाव गाव विचारले असता तिने धारुर तालुक्यातील कांदेवाडी येथील आश्रम शाळेची असल्याचे सांगितले परंतु कोणत्या आश्रम शाळेची आहे हे तिला सांगता येत नव्हते. यावर लागलीच विचार करुन पत्रकार महादेव काळे यांनी धारुर येथील त्यांचे मित्र आणि सहकारी पत्रकार रवि गायसमुद्रे यांच्याशी फोनवरून संपर्क साधुन या मुलीच्या शाळेविषयी माहिती विचारुन त्यांना त्या मुलीची पोस्ट आणि फोटो मोबाइलवरून त्यांचेसह सर्व ग्रुपवर टाकले. क्षणार्धात हि पोस्ट व्हायरल झाली. तर नाव्होली गावचे सरपंच मा. रंजित बप्पा बिक्कड यांचे नातेवाईक कांदेवाडीत असल्याने महादेव काळे यांनी त्यांच्याशी संपर्क साधला. आणि सदरील घटना सांगतली. यावर रंजित बिक्कड



यांनी त्यांचे पोलिस विभागात असणारे कांदेवाडीचे नातेवाईक श्री. खाडे यांचा नंबर दिला.पत्रकार काळे यांनी खाडे यांच्याशी संपर्क साधून त्यांना या घटनेची माहिती दिली. त्या मुलीचा फोटो आणि पोस्ट त्यांना टाकली . त्यांनी ती पोस्ट शाळेतील शिक्षकांना दिल्याने शाळेतील शिक्षक सतर्क झाले. तर पत्रकार महादेव काळे यांचे सहकारी २४/७ न्युज चॅनलचे संपादक दत्तात्रय मुजमुले यांनी हि पोस्ट पाहुन थेट आश्रम शाळेतील शिक्षकांनी संपर्क साधला. आणि हि मुलगी हरवल्याचे मुलीच्या आईला फोनवरून कल्पना दिली. तोपर्यंत मुलीचे आई आणि नातेवाईक गेले होते. केज पासुन दुर गेल्यावर लक्षात आले. तोपर्यंत शिक्षकांनी त्या मुलीच्या नातेवाईकांना संपर्क करुन मुलगी केजमध्ये असल्याचे सांगतले आणि त्या मुलीचे नातेवाईक परत गेले आणि त्यांची आणि शिवानीची भेट झाली. रात्री उशिरा हे सर्व विद्यार्थी आणि पालक शाळेत सुखरुप पोहोचले असल्याचे या आश्रम शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक श्री. कुलकर्णी सर यांनी देवुन आभार व्यक्त केले. तसेच दै.लोकनायकचे केज तालुका प्रतिनिधी महादेव काळे यांना सहकार्य करणारे त्यांचे सहकारी पत्रकार बांधव, शिक्षक, नाव्होली गावचे सरपंच व इतरांचे आभार मानले आहेत.

# नाशिक मध्ये तीन महिला सहाय्यक आयुक्त रुजू होणार.

**नाशिक/सुरेश इंगळे**

महाराष्ट्र पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्याच्या बदलाचे सत्र सुरू असून , ६८ उपविभागीय तथा सहाय्यक पोलीस आयुक्तांच्या बदल्याचे आदेश जारी करण्यात आले आहेत. यात नाशिक शहर आयुक्तालयातील दोन सहाय्यक आयुक्त तर ग्रामीण मधील एका उपविभागीय पोलीस अधिकाऱ्याची बदली झाली आहे . तर नाशिक मध्ये तीन महिला सहाय्यक आयुक्त रुजू होणार आहेत . शासनाचे अप्पर सचिव संदीप ढाकणे यांनी महाराष्ट्र पोलीस दलातील उपविभागीय तथा सहाय्यक आयुक्तांच्या बदल्यांचे आदेश जारी केले




आहे . गेल्या आठवड्यात राज्यातील ३७९ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. तर आज ६८ सहाय्यक पोलीस आयुक्त तथा पोलीस उपविभागीय अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आलेले आहेत . त्या बदल्यांमध्ये नाशिक पोलीस आयुक्तालयातील सहाय्यक आयुक्त डॉक्टर सिद्धेश्वर धुमाळ यांची अमरावती ग्रामीणमध्ये अंजनगाव उपविभागीय अधिकारी , तर तसेच नाशिक ग्रामीण दलातील पेठ च्या उपविभागीय अधिकारी कविता फडतरे यांची नाशिकच्या महाराष्ट्र पोलीस अकादमी मध्ये बदली करण्यात आली आहे . याशिवाय लातूर ग्रामीणचे उपविभागीय अधिकारी यांची नाशिकच्या अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती मुंबई ,नागरी हक्क संरक्षण चे उपाध्यक्ष सुनील घुगे व अमरावती ग्रामीणचे दर्यापूरचे उपाध्यक्ष गुरुनाथ नायडू यांची नाशिकच्या महाराष्ट्र पोलीस अकादमी तर संजय कांबळे यांची नाशिकच्या महाराष्ट्र पोलीस अकादमीतून साक्री (धुळे) उपविभागीय अधिकारी पदी नियुक्त करण्यात आली आहे .मुख्यालयाचे सहाय्यक आयुक्त अंबादास भुसारे यांची हिंगोली येथे उपविभागीय अधिकारी म्हणून बदली झाली आहे.

# आमचा टॅक्स सरकारला चालतो मग लेकरांना शाळा का नाही आझाद क्रांती सेनेचा सवाल

**माजलगाव/प्रतिनिधी**

दिनांक ३ जुलै २०२४ रोजी गट शिक्षण अधिकारी माजलगाव यांना आजाद क्रांती सेनेच्या वतीने निवेदन देण्यात आले दोन जुलै २०२४ रोजी आझाद क्रांती सेनेचे सेना प्रमुख राजेश घोडे यांनी जायकवाडी या गावास भेट देऊन तेथील परिस्थिती पाहिली परिस्थिती विदारक व भयाव आहे देशाला स्वतंत्र होऊन ७७ वर्ष होऊन गेलेली आहेत तरी देखील या गावातील दलित, शेतकरी, शेतमजूर ,हे स्वातंत्र्यात जगतात की पारतांत्र्यात असा प्रश्न पडावा अशी परिस्थिती आहे या गावाला जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेचे शिव यांनी भेट देणे गरजेचे आहे गावाला जायला रस्ता नाही गावात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही गावात शाळा नाही वर्ग खोले आहेत त्या गळतात



त्याच्यात साप खेळतात जनावरे बसतात कधी शाळा पडेल याचा भरोसा नाही अशा स्थितीमध्ये या गावातील लोक राहतात ही भयावह परिस्थिती आहे या गावातील लोकांचा सरकारला टॅक्स चालतो पण लेकरांना शिक्षण व गावकऱ्यांना मूलभूत सुविधा का मिळत नाही हा सवाल आता येथील गावकरी विचारू लागले आहेत म्हणून सरकारला जाग करण्यासाठी आज दिनांक ३ जुलै २०२४ रोजी गटशिक्षणाधिकारी माजलगाव, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, यांना निवेदन देण्यात आले लवकरात लवकर लेकरांच्या शाळेची व्यवस्था करण्यात यावी नसता तीव्र स्वरूपाचे आंदोलन छोडू अशा आशयाची निवेदनामध्ये मागणी करण्यात आली आहे या निवेदनावरती आझाद क्रांती सेनेचे सेना प्रमुख राजेश घोडे, संजय हिवाळे, अजय भिसे, ऋतिक भिसे, भारत गायकवाड, लक्ष्मण थोरात ,अरुण पिसोळे ,बळी थोरात ,बंडू थोरात, अमोल पिसुळे, विशाल थोरात, नवनाथ लोंढे, बाळू थोरात, राजेश शेवाळे, फकीरा अडागळे, सुरेश पिसोळे, कृष्ण थोरात, गणेश भिसे, आदींनी मागणी केली आहे .

# विरोधी पक्ष नेत्याच्या निलंबनाच्या निषेधार्थ पैठणला निदर्शने

**पैठण/चैताली औटे**

महाराष्ट्र विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचे विधान परिषदेतून पाच दिवसासाठी निलंबन करण्यात आल्याने पैठणला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने बस स्थानक चौकात महायुती सरकार व उपसभापती यांच्या विरोधात दि.३ जुलै रोजी निदर्शने करण्यात आले .दरम्यान जोरदार घोषणा देत यावेळी निषेध व्यक्त केला.

यापप्रसंगी पैठण विधानसभा मतदारसंघाचे नेते उपजिल्हाप्रमुख दत्ता गोर्डे, तालुकाप्रमुख मनोज पेरे, युवा सेनेचे शुभम पिवळ, पैठण विधानसभा अध्यक्ष बद्रीनारायण भुमरे, तालुका संघटक सोमनाथ जाधव, प्रकाश वानोळे ,अल्पसंख्यांक आघाडीचे तालुकाप्रमुख गणेश पटेल, शहर प्रमुख अजय परळकर, आप्पासाहेब गायकवाड, कल्याण मगरे ,संदीप परदेशी, रोहित हिंगे, निखिल काळे,संभाजी अत्रे ,निहाल सय्यद, इम्रान कुरेशी, प्रशांत देशमुख, दीपक पल्हारे ,रामूकाका पिवळ , अस्लम पठाण, शुभम गायकवाड , अज्जू कटारे ,शंकर निवारे, प्रणय शिंदे ,संतोष गोरे, संदीप हणुवते, अमोल




तुपे, संजीव कोरडे, सचिन ज्योतीक,योगराज छबिलवाड ,अनिल मगरे ,अक्षय गायकवाड, संतोष धापटे ,जाधव अण्णा,परसराम खोपडे, बाबू भोंडे ,जय पगारे ,जाकेर टेकडी, रमीज कादरी, प्रमोद चव्हाण, विशाल बनसोडे, अशोक सोनटक्के ,योगेश पाचे ,उद्धव क्षीरसागर ,पृथ्वीराज भुमरे, चैतन्य बनकर, कलीम शहा, महेश ढवळे ,विशाल क्षीरसागर, संतोष पुंड, नामदेव गलधर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. यावेळी सर्व शिवसैनिक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वृक्ष लागवड व शालेय साहित्य वाटप करून वसंतराव नाईक यांची जयंती साजरी

## उद्योजक रामशेठ राठोड यांचा स्तुत्य उपक्रम

**माजलगाव/प्रतिनिधी**
महानायक वसंतरावजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त उद्योजक रामशेठ राठोड यांनी जयंतीनिमित्त वृक्षारोपण तसेच शालेय साहित्याचे वाटपाचा स्तुत्य उपक्रम घेऊन एक आदर्श पायंडा त्यांनी घालून दिला .दि १ जुलै रोजी येथील राजानंदिनी पॅलेस वर हरित क्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांच्या १११ जयंती चे आयोजिन करण्यात आले होते रामशेठ राठोड पत्रकारांशी बोलताना बोलले की डीजे व अवंतर खर्च टाळून असे कार्यक्रम घेऊन आपण समाजाला योग्य दिशेने नेण्याचा प्रयत्न केला पाहिजे कार्यक्रमाचे अध्यक्ष मोहन काका सोळंके प्रमुख पाहुणे म्हणून राधाकृष्ण होके पाटील , रमेशराव आडसकर साहेब , महादेव तात्या निर्मळ,नारायण डक , कल्याण अबुज , कचरू तात्या खडगे . मनोहर डाके.तुकाराम येवले , उमेश मोगरेकर , बबनराव सरवदे , महावीर



मस्के आदी सह पत्रकार शेख मुजफ्फर उफाडे बाळासाहेब परमेश्वर सोळंके अमर साळवे बाळासाहेब आढागळे विष्णू दादा उगले अरविंद ओव्हळ आनंद घडसिंगे शेख अलीम विष्णू नाईक नवरे पृथ्वीराज निर्मळ बांधव यांची विशेष उपस्थिती होती तर मोठ्या प्रमाणात समाज बांधव देखील उपस्थित होते. तसेच राधाकृष्ण होके पाटील व मोहनराव काका सोळंके यांनी जयंतीनिमित्त मोलाचे मार्गदर्शन केले .या वेळी बोलताना राम शेठ राठोड म्हणाले की आपण समाजाचे काही तरी देणे लागतो आर्थिक दृष्टीने समृद्ध असणारानी गरीब समाजासाठी पुढं येण गरजेचे आहे डी जे आणि इतर धांगडधिंगा टाळून आम्ही एक हजार वृक्ष लागवड व दहा हजार वह्या असे शालेय साहित्य वाटप करून थोरांना अपेक्षित जयंती साजरी करण्याचा प्रयत्न करून आगळी वेगळी जयंती साजरी करण्याचा पायंडा उद्योजक राम शेठ राठोड यांनी घालून दिला

# नवीन मतदार नाव नोंदणी करून घ्या-पुरुषोत्तम वीर

बीड /प्रतिनिधी
केंद्रीय निवडणूक आयोगाने दिनांक २५ जून ते २५ जुलै २०२४ नवीन मतदार नोंदणी कार्यक्रम जाहीर केला असून या दरम्यान मतदारांसाठी नवीन नाव नोंदणी, नाव व पत्ता दुरुस्ती, फोटो बदलणे, मतदार संघाचे नाव बदलणे, मयत व्यक्तीचे नाव कमी करणे, मोबाईल नंबर अपडेट करणे, आधार कार्डशी लिंक करणे, नवीन voter id बनवणे या सर्व प्रकारच्या नोंदणी करण्याची मोहीम पुन्हा सुरु करण्यात आली आहे. याचा लाभ घ्यावा असे आव्हान वंचित बहुजन आघाडीचे बीड



जिल्हा सहसचिव पुरुषोत्तम ( गोटू) वीर यांनी केली आहे. आपल्या जिल्ह्यातील १८ वर्ष पुर्ण झालेल्या तरूण-तरुणी यांची नवीन मतदार नोंदणी तातडीने करून घ्यावी. निवडणूक आयोगाच्याhttps://voters.eci.gov.in/ या संकेतस्थळावरून ऑनलाइन पद्धतीने देखील नोंदणी करता येईल. नवीन मतदार नोंदणी करिता आपल्या जिल्ह्यात व बीड शहरातील 18 वर्ष पुर्ण झालेल्यानी नाव नोंदनी करावी असे बीड जिल्हा सहसचिव पुरुषोत्तम (गोटू) वीर यांनी केले आहे. तरी जास्तीत जास्त मतदार नोंदणी करून घ्यावी.

# पुण्याच्या संमीद्रा फाउंडेशनने २०० आदिवाशी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला दिला आधार

**शिरूर कासार/प्रतिनिधी**
सध्याच्या परस्थितीत शिक्षण म्हणजे फक्त श्रीमंतांनी घ्यावे अशी परस्थिती निर्माण झाली आहे. भरमसाठ फी वाढ, शैक्षणिक साहित्याच्या वाढलेलंय किंमती सारासार विचार करता गरिबाला शिक्षण परवडेना झाले आहे. त्यामुळे पुणे येथील सामाजिक संस्था, संमिद्रा फाउंडेशन यांनी ही गरज ओळखून बीड जिल्ह्यातील २०० आदिवाशी विद्यार्थ्यांना वर्षभर पुरेल एवढे शैक्षणिक साहित्य देऊन त्यांच्या शिक्षणाला मोठा आधार दिला आहे. पेन्सिल,खोड रबर,पेन, वही, चित्रकला वही, रंग पेटी, आणि चांगल्या प्रतीचे दफ्तर पाहून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरून आनंद ओसंडून वाहतांना दिसत होता.



ओसतोड मजुरांचा तालुका म्हणून ओळख असलेल्या शिरूर कासार तालुक्यात शैक्षणिक आलेख हळू हळू वाढत असून गेल्या दहा वर्षापासून पुणे, मुंबई, अहिल्यानगर येथील सामाजिक संस्था व सामाजिक कार्यकर्ते या तालुक्यातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करत असल्याने गुणांवत्ते बरोबर विद्यार्थ्यांची उपस्थितीचा टक्का सुद्धा वाढत आहे. पुण्याची संमिद्रा फाउंडेशन, निरंजन सेवाभावी संस्था अश्या विविध संस्था विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याबरोबर दुर्गम, ग्रामीण भागातील मुलांना शाळेला येण्याजाण्यासाठी सायकल,RO फिल्टर पाणपोई,डिजिटल क्लास रूम, टॅब अश्या विविध शैक्षणिक आलेख वाढणाऱ्या उपयोगी वस्तू देत असल्याने विद्यार्थ्यांची शिक्षणातील गोडी वाढत आहे. काल पुणे येथील संमिद्रा फाउंडेशन या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सदाशिव थोरात यांनी शिरूर कासार तालुक्यातील भटक्या समाजातील 200 आदिवाशी विद्यार्थ्यांना एक वर्ष पुरेल एवढे शैक्षणिक साहित्य दिले. गेल्या वर्षी सुद्धा या संस्थेने १०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन शिक्षणाला आधार दिला होता. भिल्ल, पारधी, घिसाडी, वडार, वैदू, डब्यातील आईवाले, वासुदेव, बहुरूपी या समाजातील मुलांना शिक्षणाचा वारा लागवा म्हणून अगदी शहराच्या जवळच जिल्हा परिषद प्राथमिक रामनगर वस्तीशाळा असून या शाळेसह, दुर्गम भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शिंदेवस्ती शाळा,ऐन डोंगराच्या कुशीतील जिल्हा परिषद उथळावस्ती शाळा अश्या शाळेतील मुलांना या शैक्षणिक किट वाटप करून त्यांना शिक्षणात मोठा आधार दिल्याचे त्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंदातुन स्पष्ट दिसत होते. यावेळी या संस्थेचे अध्यक्ष सदाशिव थोरात, एकलव्य संघटनेचे युवराज बर्डे, जालिंदर विद्यालयाचे माजी प्राचार्य दादासाहेब खोले, अप्पासाहेब शिंदे सर, कन्नालाल खामकर सर, केदार सर, अंदुरे सर, विष्णू माळी, कालिदास माळी,यांच्या सह ग्रामस्थ विद्यार्थी यांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती.

# धनगर व वडार समाजासाठी आमरण उपोषणाकडे शासकीय यंत्रणेने पाठ फिरवली.

**बीड/प्रतिनिधी**
धनगर व वडार जमतीचा एस् टी प्रवर्गात आरक्षणाची अंमलबजावणी करा यासाठी भाई आकाश निर्मळ यांचे आमरण उपोषण २९ जून पासून बार्शी नाक्यावर सुरु आहे गेल्या ३३ वर्षापासून धनगर व वडार जमातीचा एस् टी प्रवर्गात समावेश करावा या मागणीसाठी आंदोलन चालू आहे. या मागणीसाठी राज्य सरकारचे लक्ष केंद्रित करण्यासाठी बुधवार दिनांक २९ जून पासून बार्शी नाका येथे जुन्या आरटीओ मैदानावर भाई आकाश निर्मळ हे आमरण उपोषणासाठी बसले मात्र आहेत पण आजपर्यंत शासनाने या उपोषणाची दखल घेतली नाही. धनगर व वडार समाज आर्थिक दृष्ट्या मागासलेला असून या भटक्या जातीच्या समावेश एसटी प्रवर्गात करावा अशी गेल्या अनेक दिवसापासून मागणी होत आहे .मात्र या मागणीला राज्य सरकार सकारात्मक प्रतिसाद देत नाही .




या मागणीला अधिक धार आणण्यासाठी भाई आकाश निर्मळ यांनी धनगर आणि वडार समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षणाची अंमलबजावणी करा यासाठी अमर उपोषण सुरू केले असून ते गेल्या सहा दिवसापासून हे उपोषण चालू असून या उपोषणास भेट देण्यासाठी पुण्याच्या मावळा संघटनेच्या संस्थापक अध्यक्षा व शेकापच्या नेत्या रुपालीताई पाटील व मध्यवर्ती कमेटी सदस्य भाई चंद्रशेखर नलावडे पाटील, राजेंद्र देवकर, सुरज पवार, तसेच पिंपळादेवीचे सरपंच दत्ता किवणे, प्रा. अमोल ढोरमारे, ऊबाठा शिवसेनेचे पिंपळनेर सर्कलचे युवानेते अंगद किवणे, राष्ट्रीय समाज पक्षाचे काकासाहेब कानाडे धनगर युवा सेनेचे अकोले तालुका अध्यक्ष संजय महानौर कळमनुरी तालुका यशवंत सेनेचे अध्यक्ष ईश्वर कावळे, नांदेड राष्ट्रीय समाज युवानेते नरेंद्र प्रभाळे धनगर शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक जनजागृती मंचचे संस्थापक अध्यक्ष कोंडीबा वाघमोडे, डॉ. शितल चोरमले, बीड शहरातील उद्योजक बाबुलालसेठ ढोरमारे, पिंपरगव्हाणचे माजी सरपंच नारायण मतकर, पिंपळवंडीचे सामाजिक कार्यकर्ते केशव प्रभाळे, दत्ता कानाडे, कृष्णा काळे, पिंपळगांवचे धनगर समाजाचे कार्यकर्ते नारायण धापसे, वडार समाजाचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रामलिंग गायकवाड यांच्यासह वडार व धनगर समाजाच्या विविध संघटनेचे नेते, पदाधिकारी कार्यकर्ते सर्व सामान्य धनगर व वडार समाज बांधव उपोषण स्थळी भेट देत आहेत. पण आमरण उपोषणाचा आज पाचवा दिवस उलटला तरी शासकीय यंत्रणेने गेंड्याची कातडी पांघरल्यामुळे अद्यापही शासकीय यंत्रणेतील प्रशासकीय अधिकारी या आमरण उपोषणाकडे साधा फिरकला नाही. जोपर्यंत धनगर आणि वडार समाजाला जोपर्यंत एस् टी प्रवर्गाची आरक्षणाची अंमलबजावणी होत नाही. तोपर्यंत उपोषण सोडणार नाही अशी माहिती भाई आकाश निर्मळ यांनी घेतला आहे.

# विद्यापीठ परीक्षेत वसंतराव काळे पत्रकारिता महाविद्यालयाचे यश

## पत्रकारिता पदवी परीक्षेत शेख समीर प्रथम,नागरगोजे नितीन द्वितीय तर फारुकी रिजवान तृतीय

**बीड/प्रतिनिधी**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाद्वारे शैक्षणिक वर्ष २०२३/२४ च्या मार्च/ एप्रिल २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या पदवी सत्र परीक्षेचे निकाल विद्यापीठने नुकतेच जाहीर केले असून, वसंतराव काळे कॉलेज ऑफ जर्नालिझम अँड कॉम्प्युटर सायन्स बीड महाविद्यालयाचे बी.जे पत्रकारिता पदवी अभ्यासक्रमाचा ९६% निकाल लागला आहे. या संदर्भात अधिक माहिती अशी की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर विद्यापीठाने मार्च/ एप्रिल २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या विद्यापीठ सत्र परीक्षेचे पत्रकारिता बी.जे. पदवी . अभ्यासक्रमाचा निकाल विद्यापीठाकडून नुकताच जाहीर झाला आहे. येथील वसंतराव काळे कॉलेज ऑफ जर्नालिझम कॉम्प्युटर सायन्स बीड महाविद्यालयातील बी. जे. पदवी अभ्यासक्रमांमधून अनुक्रमे शेख समीर सत्तार प्रथम, नागरगोजे नितीन सदाशिव द्वितीय तर फारुकी







रिजवान जब्बार तृतीय क्रमांक मिळवून उत्तीर्ण झाले आहेत. त्यांच्या या यशाबद्दल संस्था अध्यक्ष मा. रमेश भाऊ पोकळे, सचिव प्रा. गणेश पोकळे, प्र. प्राचार्य बप्पासाहेब हावळे व सर्व कर्मचारी वृंदांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# खासदार बजरंग (बप्पा) सोनवणे यांच्या स्वागताची केजमधे जोरदार तयारी सुरु



**केज / प्रतिनिधी**
बीडचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या स्वागतासाठी केजमधे सध्या त्यांच्या चाहत्यांनी जोरदार तयारी सुरू केली असून त्यांचा भव्य असा स्वागत समारंभ आयोजित करण्यात येत असल्याचे कळते. बीड लोकसभा मतदारसंघात विजयी झालेले बजरंग बप्पा सोनवणे यांचा वाढदिवस अगदीच जवळ आलेला आहे आणि त्या निमित्ताने त्यांचे प्रचंड स्वागत केले जाणार आहे. त्यांच्या कार्यकर्त्यांनी दोनतीन दिवसांपासून त्यासाठी मोठी तयारी देखील सुरू केलेली दिसुन येत आहे. बप्पा खासदार झाल्यामुळे केज तालुक्यातीलच नव्हे तर संपूर्ण बीड जिल्ह्यातच त्यांच्या आगमनाची आता उत्सुकता लागून राहिली आहे. यामुळे केज मधे होणाऱ्या कार्यक्रमास प्रचंड मोठ्या संख्येने त्यांचे चाहते जमणार आहेत.

# परळी गोळीबार, हत्या प्रकरणी वेगळे वळण वाल्मीक अण्णा कराड सह १५ ते २० जना विरोधात गुन्हा दाखल

**परळी/प्रतिनिधी**
परळी शहरात काही दिवसापूर्वी मरळवडीचे सरपंच बाप्पू आंधळे यांच्यावर गोळीबार केल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला होता. त्या प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष बबन गीते सह इतरांवर ३०७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. काल परळी बंद ठवण्यात आली होती. या प्रकरणाला आता वेगळेच वळण मिळाले असून महादेव गीते यांनी परळी शहर ठाण्यात तक्रार दिली आहे की वाल्मीक अण्णा यांच्या बंगल्यावर बोलवल्यावंर का आला नाहीस? म्हणून १५ ते २० जणांनी महादेव गीते यांच्या घरी येऊन शिवीगाळ करत घरासमोरील स्कॉर्पिओ गाडीची तोडफोड केली. महादेव गीते हे घराच्या बाहेर येतात जीवे मारण्याच्या उद्देशाने पोटावर बंदुकीने फायर करत हातावर कोयत्याने वार करण्यात आला. या प्रकरणी बाप्पू आंधळे (मयत), राजेश फड, रघुनाथ फड, गोट्या गित्ते, वाल्मीक अण्णा कराड यांनच्या सह १५ ते २० जनावर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# महाराष्ट्र राज्य नगर परिषद, नगरपंचायत कर्मचारी नविन कार्यकारणी जाहिर



उरण/विठ्ठल ममताबादे राज्य नगर परिषद, नगरपंचायत कर्मचारी/संवर्ग कर्मचारी संघटनेची सर्वसाधारण सभा व मेळावा खोपोली-रायगड येथे संघटनेचे प्रदेशाध्यक्ष श्री. सुरेश पोसतांडेल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. सदर सभेत संघटनेच्या उपविधी नियम ९ व १० नुसार संघटनेच्या कार्यकारणी/ व्यवस्थापन समितीवर नवीन पदाधिकाऱ्यांची दिनांक ११/०६/२०२४ च्या कार्यकारणी सभेत निवड करण्यात आली होती. सुरेश पोसतांडेल -प्रदेशाध्यक्ष, रामेश्वर वाघमारे - प्रदेश कार्याध्यक्ष , गिरीश डुबेवार-प्रदेश उपाध्यक्ष, अनिल पवार -प्रदेश सरचिटणीस, लालू सोनकांबळे- प्रदेश कोषाध्यक्ष, विजय भोंडवे- प्रदेश संघटक यांच्या निवडीस एकमताने मान्यता देण्यात आली.

तसेच या सभेत असे मंजूर करण्यात आले की, नगरपरिषद, नगरपंचायत कर्मचारी/संवर्ग कर्मचारी यांच्या प्रलंबित मागण्या संदर्भात मा.शासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी व मागण्या मान्य करून घेण्यासाठी चार टप्प्यात आंदोलन करून जर मागण्यां मान्य न झाल्यास येणा-या विधान सभेच्या निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा एकमताने निर्णय घेण्यात आला.

सदर सभेस सुरेश पोसतांडेल -प्रदेशाध्यक्ष,के.के.आंधळे- संस्थापक अध्यक्ष- प्रमुख, गिरीश डुबेवार-प्रदेश उपाध्यक्ष, अनिल पवार -प्रदेश सरचिटणीस, लालू सोनकांबळे- प्रदेश कोषाध्यक्ष, विजय भोंडवे- प्रदेश संघटक ,विश्वनाथ घुगे - संघटना प्रमुख, धर्मा खिल्लारे- प्रमुख मार्गदर्शक, मारोती गायकवाड- राज्य समन्वयक,देवराम मुके,सदाशिव कवडे-कार्यालय प्रमुख, प्रशांत रहागडले -सह.सरचिटणीस झुंबर माने- कायदेशीर सल्लागार ,सल्लागार समिती- सदाशिव कवडे,रमेश वाळकीकर,त्रिंबक देशमुख, गजानन इंगळे,सुभाष मोरे,सोनुने तसेच महीला संघटक- रंजना दुर्गाडे,हिमाली कुलकर्णी,अश्विनी धोंडगे,शैलेजा फुलारे , विभागीय अध्यक्ष-नासीर अली सय्यद (नागपूर),बलभीम शेंडगे (मराठवाडा),मंगेश पाटील (कोकण),किरण आहेर (नाशिक)जिल्हा अध्यक्ष-राजेश शिंदे (रायगड), जालींदर पवार (नाशिक)सुभाष साळुंखे(ठाणे) मार्तंड वनजे(नांदेड),मंगेश पेडामकर (रत्नागिरी),देवा देवकुळे,संतोष देशमुख, सुनिल जाधव तसेच मोठ्या संख्येने पदाधिकारी, सदस्य व महिला सदस्य उपस्थित होते.

## आरोग्य सहाय्यिका बीजूताई ढाकणे-शिरसाठ यांचा सेवापुर्ती कार्यक्रम संपन्न...

### बिजुताई ढाकणे यांचे कार्य म्हणजे सेवा परमोधर्म

**शिरूर कासार/प्रतिनिधी**

आरोग्य विभाग बीड अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रात दि. २६ फेब्रुवारी १९८६ ते ३० जून २०२४ या कालावधीत आपली सेवा लोणी, मानूर ,शिरूर कासार येथे ३८ वर्षे ४ महिने ४ दिवस पूर्ण करत बिजूताई जगन्नाथ ढाकणे या सेवानिवृत्त झाल्या. आपल्या संपूर्ण सेवेत त्यांनी सामान्य माणसाच्या आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान देत खूप प्रामाणिक व जबाबदारीने सेवाकार्य पार पाडले आहे. बीजुताई ढाकणे यांनी संपूर्ण सेवेत कामाला प्रथम प्राधान्य दिले.कार्य हेच ध्येय मानून काम केले त्यामुळे त्यांना अधिकच्या दोन वेतनवाढ मिळाल्या. चांगल्या कामाचे फळ म्हणून त्यांना मुंबई येथे २००४ चा राज्यस्तरीय उत्कृष्ट आरोग्य सेविका पुरस्कार देऊन गौरविण्यात आले होते. यावेळी आरोग्य सहाय्यिका बीजूताई ढाकणे बोलताना म्हटल्या की माझी सेवा यशस्वी होताना अनेकांचे सहकार्य मिळाले. माझे पती लिंबाजी शिरसाट व परिवारातील सर्व सदस्यांची खूप खूप साथ मिळाली.मला कोणतेही वाहन चालवता येत नाही पण कधीही माझे काम थांबले नाही.जेंव्हा ज्यांना जी गरज आहे त्यांना ती मदत करण्याचा प्रयत्न केला.माझ्या संपूर्ण सेवेत एकही शासकीय तक्रार नाही. शासकीय अधिकारी,सहकारी व लोक यांच्याशी स्नेहाचे नाते जोडत मी माझे कार्य पूर्ण करत राहिले व यामध्ये मला सर्वांचे सहकार्य मिळाले.माझ्या सेवेत एक घटना नेहमी मला प्रेरणा ऊर्जा देत असते. आरोग्य सेवा ही जनसेवा अर्थात ईश्वरसेवा मानूनच मी ते व्रत केले . आरोग्य अधिकारी, सहकारी वर्गाचे खूप सहकार्य मिळाले.माझ्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सर्व जनता जनार्धनाचे खूप सहकार्य मिळाले. मी त्यांना जे सांगत असायचे त्याबाबतीत ती माणसं माझ्या विचारांना स्वतःच्या कृतीत आणत असायची याचा मला खूप अभिमान आहे. “सेवा परमो धर्म” या ऊक्तीचा उपयोग थोडा का होईना मला माझ्या संपूर्ण कार्यकाळात कृतीत आणता आला याचाही अभिमान वाटतो. सामान्य माणसाचे जीवन व हलाखीची परिस्थिती यामधून त्यांना जी काही यथायोग्य सेवा देता आली ती मी देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला,असे मत माध्यमांशी बोलताना त्यांनी व्यक्त केले.



३ जुलै २०२४ या दिवशी सिद्धेश्वर संस्थान शिरूर कासार येथे त्यांचा सेवानिवृत्तीचा कार्यक्रम पार पडला. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून चालू असणाऱ्या योजना लोकांपर्यंत पोहोच करणे,लसीकरण,साथीच्या रोगतील जनजागृती,कुटुंब नियोजन,शाळा भेटी देऊन मुलांची आरोग्य तपासणी यांसारख्या सर्व सेवा प्रामाणिकपणे देण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोग्य सहाय्यिका बीजूताई ढाकणे-शिरसाट या सेवेतून निवृत्त होत आहेत.एका प्रामाणिक व्यक्ती कडून मिळणारा स्नेह थांबला याबाबत अनेक लोकांच्या मुखातून त्यांची उणीव नक्की भासेल असे उद्गार व्यक्त होत आहे. सेवापुर्ती कार्यक्रम प्रसंगी इंदुवासिनी देवस्थान पिंपळनेर चे श्री 1008 महामंडलेश्वर त्रिविक्रमानंद महाराज,श्री सिद्धेश्वर संस्थान शिरूरचे श्री विवेकानंद शास्त्री महाराज, खंडोबा देवस्थान लोणीचे यादव महाराज बडे,श्री नागनाथ देवस्थान मानूरचे श्री ष ब्र १०८ विरूपाक्ष शिवाचार्य मानूरकर महाराज इत्यादीं संत-महंत व प्राथमिक आरोग्य केंद्राचे सर्व अधिकारी,कर्मचारी, ढाकणे-शिरसाठ कुटुंबाचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आवर्जून उपस्थित डॉ.लक्ष्मीकांत तांदळे,डॉ.अशोक गवळी, डॉ.राजेश तांदळे, डॉ.मृणाली घुगे,डॉ.पूजा मस्के, डॉ सुहास खाडे, डॉ गव्हाणे मॅडम, डॉ परमेश्वर बडे, डॉ राहुल सानप सर, डॉ.राठोड सर,सर्वांनीच आदरणीय बीजूताई ढाकणे-शिरसाठ यांना पुढील आरोग्यमय जीवनासाठी खूप खूप शुभेच्छा दिल्या.

## पिंपळवंडी येथे आज गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**पिंपळवंडी/प्रतिनिध** पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील स्वराज्यझेप प्रतिष्ठान यांच्या वतीने शुक्रवार दि.५ जुलै २०२४ रोजी सकाळी १० वाजता गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचे आयोजन केले असून या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात येत आहे.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गुरुवर्य महंत श्री.स्वामी महादेवानंद भारती महाराज श्री क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थांनचे मठाधिपती तसेच प्रमुख उपस्थिती परमेश्वर सातपुते शिवसेना जिल्हाप्रमुख बीड,प्रमुख मार्गदर्शक प्रमोद कुदळे उपविभाग अधिकारी पाटोदा,संदीप पवार सर राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक,भार्गव सपकाळ स.पोलीस निरीक्षक अंमळनेर पोलीस ठाणे हे राहणार आहेत.

## बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून परळीतील ११३ बांधकाम कामगारांना गृहउपयोगी संचाचे वाटप

### कामगार मंडळाने प्रत्येक तालूक्याच्या ठिकाणी वाटप करावे-प्रा.बी.जी.खाडे

परळी/प्रतिनिधी

बीड जिल्हा बांधकाम कामगार संघटनेने (लालबावटा) नोंदी केलेल्या ११३ बांधकाम कामगारांना गृहउपयोगी संचाचे (भांडे) मंडळाकडून बीड येथे वाटप करण्यात आले. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातर्फे बांधकाम कामगारांना सुरक्षा(पेटी) व गृहउपयोगी संच(भांडे) मोफत वाटप केली जातात. यापूर्वी पेट्या व गृहउपयोगी संच तालुक्याच्या ठिकाणी किवा कामगारांच्या राहत्या गांवात आणून दिले जात होते. परंतू कामगारांची फार लूट होत आहे म्हणून मंडळाने जिल्हा ठिकाणीच पेट्या व भांडे कामगारांना देण्याचा निर्णय घेतला आहे असे अधिकाऱ्यांकडून बोलते जाते.

गृहउपयोगी संच आणणे प्रत्येक कामगाराम अत्यंत त्रासदायक आहे.संच वाटप केंद्र बीडपासून आठ किलोमीटर दूर आहे व रिक्षा किमान ५०० रु. घेतो. जिल्हयातील बांधकाम कामगारांना संच मिळण्यासाठी तालुक्याप्रमाणे वार ठरवून दिले आहेत परंतू जिल्हयातील सर्व ठिकाणचे



कामगार रोज येतात. आलेले कामगार कोणाचेच ऐकत नाहीत. वाटप कंत्राटदार हातबल आहे. कोणत्याही अधिका-याचा कसलाच प्रभाव नाही व कामगार ऐकतच नाहीत. संघटनेने परळीतून मोठे टेम्पो भरून ११० कामगार बीडला नेले होते, कामगार घरून सकाळी ८ वाजता निघाले व रात्री ११ वाजता परळीत आले. कामगारांना त्यांच्या जवळची भाकरी खाता आली नाही. कामगारांबरोबर प्रा. खाडे, शेख जावेद, शेख अजहर, शेख नवीद, प्रकाश वाघमारे, बाबा रोडे, प्रमुख कार्यकर्ते होते. त्यांनी भरपूर मेहनत घेतली. एका कामगाराला स्वतंत्र भांडे आणण्यास अनाठायी खर्च होतो. बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून कामगारांना मोफत भांडे वाटप आहे अशी जागृति निर्माण करावी तसेच सामाजीक कार्यकर्त्यांकडून लूट होणार नाही याचा प्रयत्न करावा. तसेच सुरक्षा संच व गृहउपयोगी संच किमान तालुक्याच्या ठिकाणी आणून द्यावेत ही बीड जिल्हा बांधकाम कामगार संघटनेची मागणी आहे.

## आंतरभारतीचा स्नेहसंवर्धन पुरस्कार केरळच्या सिंधू पणीकर (नवगिरे) यांना जाहीर

### पुरस्कार १५ ऑगस्ट रोजी वितरण

**अंबाजोगाई/प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथिल आंतरभारतीचा स्नेहसंवर्धन पुरस्कार यंदा केरळची कन्या सिंधू पुरुषोथमन पणीकर (नवगिरे) यांना दिला जाणार आहे. सदरील पुरस्कार दि. १५ ऑगस्ट रोजी दिला जाणारा आहे. अंबाजोगाई येथे अन्य प्रांतातून येऊन वास्तव्य करणाऱ्या व अंबाजोगाईच्या गौरवात भर टाकणाऱ्या व्यक्तीला हा पुरस्कार दिला जातो. श्रीमती सिंधू ह्या केरळच्या कोट्यायम जिल्ह्यातल्या. बी एस्सी नरसिंग करून अंबाजोगाईत आल्या. सुरुवातीला मानवलोक मध्ये काम केले. नंतर एम आय टीत सेवा दिली. तेथेच मारुती नवगिरे यांचा परिचय झाला. त्यांनी आंतर प्रांतीय व मानवी विवाह केला. पुढे त्यांनी बी एड करून एम आय टीच्या सरस्वती विद्यालयात सहशिक्षिकेची नोकरी पत्करली. श्रीमती सिंधू यांनी इंग्रजीत एम ए केले आहे. त्यांची दोन्ही मुले पुण्यात शिक्षण घेत आहेत. केरळची कन्या आंबाजोगाईची सून आहे म्हणून तिचा सन्मान करणे अंबाजोगाईकरांचे कर्तव्य ठरते. याच भावनेने हा पुरस्कार दिला जात आहे.



२०१४ ला प्राचार्य बी.आय. खडकभावी यांचा सन्मान करून स्नेहसंवर्धन पुरस्कार सुरू करण्यात आला होता. त्यानंतर मनीष स्वीटचे शशिकांत रूपडा (गुजरात), प्राचार्य महावीर शेट्टी (कर्नाटक), मेवाडचे शंकरजी मेहता (राजस्थान), आनंदराव अंकम (तेलंगणा), उडपी हॉटेलच्या सुशीलाताई शेट्टी (कर्नाटक), सिमेंटच्या वस्तूंचे निर्माते शेख शमीम (उत्तर प्रदेश), लाकडी काम करणारे राजू जागींड (राजस्थान), टायर रिमोल्ड करणारे अजिथकुमार कुरूप (केरळ), वाचमनचे काम करणारे नरपती कुंजेडा (नेपाळ) यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. अन्य प्रांतातून येऊन स्थायिक झालेल्या व शहराच्या गौरवात भर घालणाऱ्या व्यक्तीचा आंतरभारती तर्फे सन्मान करण्याची परंपरा अंबाजोगाईने सुरू केली आहे. या मागे ‘हम सब एक हैं’ ही राष्ट्रीय एकात्मतेची भावना बळकट करण्याचा विचार आहे.

## श्री क्षेत्र अश्वत्थलिंग ते पंढरपूर पायी दिंडीचे उद्या होणार प्रस्थान -महादेवानंद भारती महाराज

पिंपळवंडी/प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री क्षेत्र अश्वत्थलिंग महादेव मंदिर संस्थांनची पिंपळवंडी ते पंढरपूर आषाढी वारी निमित्त पायी दिंडी सोहळ्याचे उद्या शनिवार दि.६ जुलै २०२४ रोजी सकाळी ९:३० वाजता प्रस्थान होणार असून या पायी दिंडी सोहळ्यात सर्व भाविकांनी सहभागी होऊन पंढरीची वारी करावी असे आवाहन श्री क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थांनचे मठाधिपती श्रीश्री १००८ श्री स्वामी महंत परमपूज्य गुरुवर्य महादेवानंद भारती महाराज यांनी केले आहे. याविषयी माहिती अशी



की,श्री स्वामी महंत गुरुवर्य महादेवानंद भारती महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली याही वर्षी दि.६ ते १८ जुलै २०२४ दरम्यान पिंपळवंडी ते पंढरपूर दरम्यान पायी दिंडीचे आयोजन केले असून शनिवार दि.६ जुलै २०२४ सकाळी ९:३० वाजता श्री अश्वत्थलिंग महादेव मंदिर व श्री. स्वामी गंगाभारती महाराज मठ येथे पूजा आरती होऊन प्रस्थान होऊन सकाळी ११ वाजता पिंपळवंडी येथे दिंडीचे स्वागत व चहा व नाष्टाचे आयोजन केले असून पायी दिंडी कुसळंब-सौताडा-जामखेड,जामखेड तालुक्यातील चुंबळी,पाडळी फाटा, धोंडपारगाव तसेच आळजापुर फाटा, पोथरे,करमाळा,देवळाली,कुंभज फाटा,आदिनाथ सहकारी कारखाना, बिटरगाव,फूट जळगाव,टेंभुर्णी,परीते, करकम मार्गे रविवार दि.१४ जुलै २०२४ रोजी महादेवानंद भारती बाबा मठ शेगाव दुमाला पंढरपूर येथे पोहोचणार असून पायी दिंडीचे मार्गात अनेक ठिकाणी दिंडीतील वारकऱ्यांसाठी चहा,नाश्ता,भोजनाची सोय भाविक अन्नदात्यांनी केलेली असून दिंडी मुक्कामी ठिकाणी नियमित रात्री हरिकिर्तन,हरी जागर होणार आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077